Smart ways for 100% success
in the HSC Board Exam.

# EXCLUSIVE STUDY MATERIAL FOR HSC STUDENTS

**Subject**: Political Science.

**Prepared by**

State Council of Educational Research and Training, Maharashtra, Pune.

# राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र, पुणे.

## इयत्ता १२वी पुनर्रपरीक्षार्थीसाठी साहित्य निर्मिती

## --अनुक्रमणिका--



| अ.क्र. | पुनर्रपरीक्षार्थी साठी साहित्य |
|---|---|
| 01 | राज्यशास्त्र सराव प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका - ०1 |
| 02 | राज्यशास्त्र प्रश्नपेढी प्रकरण ०1 |
| 03 | राज्यशास्त्र प्रश्नपेढी प्रकरण ०2 |
| 04 | राज्यशास्त्र प्रश्नपेढी प्रकरण ०3 |
| 05 | राज्यशास्त्र प्रश्नपेढी प्रकरण ०4 |
| 06 | राज्यशास्त्र प्रश्नपेढी प्रकरण ०5 |
| 07 | राज्यशास्त्र प्रश्नपेढी प्रकरण ०6 |
| 08 | राज्यशास्त्र सराव प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका - ०2 |



## नमुना प्रश्न पत्रिका

इयत्ता – १२ वी कला | विषय :- **राज्यशास्त्र-(४२)** | वेळ:३ तास | एकूण गुण - ८०

**प्र. १ अ योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा** ०५

१) भारतातील...........या राज्यात सर्वांत प्रथम लोकायुक्त संकल्पना राबविली गेली

(राजस्थान, मध्यप्रदेश, गोवा, महाराष्ट्र)

२) जम्मू कश्मीर राज्याला विशेष दर्जा देणारे कलम..........ऑगस्ट २०१९ रद्द करण्यात आले

(३५२,३७०, ३८०, २१५ )

३) नीती आयोगाची स्थापना...........साली करण्यात आली

( १९५०, २०००,२०१५,२०२०)

४) .......... मधील अरब स्प्रिंग या क्रांतीला फेसबुकक्रांती असे संबोधित करतात.

(पॅरिस, इजिप्त, अमेरिका, चीन)

५) नागरिकांची सनद ही संकल्पना.......... याचा भाग आहे.

(विकासप्रशासन, सुशासन, बिगर सरकारी उपक्रम).

**ब) खालील पैकी गटातील चुकीची जोडी दुरूस्त करून पुन्हा लिहा** ०३

१) अ) सुशासन - कायद्याचे राज्य

ब) सोशल नेटवर्किंग - तात्काळ संपर्क

क) बिगर राजकीय अभिकर्ते- आशियाई विकास बैंक

२) अ) युरोप – शांघाय सहकार्य संघटना

ब) आफ्रिका - ब्रिक्स

क) दक्षिण पूर्व आशिया - सार्क

३) अ) दप्तर दिरंगाई – पारंपारिक प्रशासन

ब) पंचवार्षिक योजना - विकास प्रशासन

क) पारदर्शकता - आधुनिक प्रशासन

**क) योग्य कारण निवडून विधान पूर्ण करा** ०४

१) बहुध्रुवीय जागतिक व्यवस्था अस्तित्वात आली, कारण.........

अ) रशिया, चीन, भारत या प्रदेशांचे प्रस्थ वाढले

ब) शीतयुद्ध संपुष्टात आले

क) सोव्हियत युनियनचे विघटन झाले

२) ई-शासनामुळे शासकीय कामांचा वेग वाढला आहे, कारण..

अ) ते यांत्रिक आहे

ब) माहितीचे संग्रहन, माहितीची उपलब्धता आणि माहितीचे वहन विनाविलंब होते

क) शासनाची प्रादेशिक व्याप्ती वाढते

३) भारत व अमेरिकासारख्या देशांसमोर राष्ट्रीय एकात्मता साध्य करण्याची समस्या आहे ,कारण..........

अ)सार्वजनिक अराजक मोठ्या प्रमाणात आहे

ब) नेतृत्वावर जनतेचा विश्वास नाही

क) ते देश बहुवांशिक, बहुधर्मीय, बहुसांस्कृतिक आहेत

४) १९९०पूर्वी भांडवली गुंतवणुकीत मुक्त संचार जगात नव्हता, कारण

अ) उद्योगधंद्याचा फारसा विकास झालेला नव्हता.

ब) त्या काळात गुंतवणुकीवर सरकारी नियकांचे अडथळे होते

क) भांडवलदारांना गुंतवणुकीत फारसा रस नव्हता.

**ड) दिलेल्या विधानांकरीता समर्पक संकल्पना लिहा** **०४**

१) जेव्हा एक राज्य इतर राज्यावर लष्करी ताकदीच्या वापराशिवाय प्रभाव पाडते

२) समाजात भीती/घबराट/ धास्ती निर्माण करण्यासाठी हिंसाचाराचा केलेला वापर

३) भारतातील युवकांना कौशल्य प्रशिक्षण देण्याची योजना. -

४) अनेक देशांत कार्यरत असलेली कंपनी-

**इ) गटात न बसणारा शब्द ओळखा व लिहा.**


१) पेटंट, शिक्षण, कॉपीराइट, ट्रेडमार्क

२) मोबाईल, सॅटेलाईट, इंटरनेट, ग्रामोफोन

३) दहशतवाद, नक्षलवाद, राष्ट्रवाद, उग्रवाद

४) बर्गर, पिझ्झा, मॅकडोनाल्ड, विमानतळ

**प्र .२ अ) संकल्पना चित्र पूर्ण करा.** **०४**




**ब) पुढील नकाशाचे निरीक्षण करून त्या पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा** **०५**




१) रशियाला लागून सीमा असणाऱ्या दोन देशांची नावे लिहा

२) व्हॅटिकन सिटी कोणत्या समुद्रात आहे

३) काळा समुद्र कोणत्या देशांच्या जवळ आहे

४) युरोप खंडातील देशांची नावे लिहा

**५) सो.रशियाच्या विघटनातून नवीन निर्माण झालेल्या देशांची नवे लिहा**

**प्र.३ खालील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा. (कोणतेही पाच) १०**

१) दक्षिण आशियातील व्यापारासाठी सार्क महत्वाचे आहे

२) राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना महिला हक्क संरक्षणासाठी करण्यात आली.

३) जागतिकीकरण छोट्या शेतकऱ्यांसाठी फलदायी नाही

४) सागर माला या योजनेत रस्तांच्या व्यापक विकास अभिप्रेत आहे.

५) भारतीय स्वातंत्र चळवळ राष्ट्रीय एकात्मतेस पोषक ठरली.

६) भारताने अलिप्तता वादाचा स्वीकार केला आहे.

७) युरोपियन समाजाचे वर्तन करण्यासाठी मेल्टींग पॉट ही संकल्पना वापरली जाते

**प्र.४ खालील विधानांचा सह संबंध स्पष्ट करा. (कोणतेही तीन) ०९**

१) सुशासन आणि ई –प्रशासन

२) शीत युद्ध आणि अलिप्ततावादी चळवळ

३) गरिबी आणि विकास

४) जागतिकीकरण आणि संस्कृती

**प्र.५ खालील विषया वर तुमचे मत २५ते३० शब्दांत मांडा. (कोणतेही तीन ) १२**

१) भारत एक उगवती सत्ता

२) ई-प्रशासनाने प्रशासनाला जनतेच्या जवळ आणले आहे

३) हिंदी महासागरात भारताची भूमिका

४) जागतिकीकरणामुळे भारतीय कुटुंबव्यवस्था बदलली आहे.

५) सहभागी राज्य समाजासाठी हितकारक आहे

**प्र .६ खालील प्रश्नांची ८०ते१०० शब्दांत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) १०**

१) भारत-चीन संबंधावर थोडक्यात चर्चा करा

२) सोव्हिएत युनियनच्या विघटनाचे परिणाम लिहा

३) दहशतवाद म्हणजे काय? त्याचे स्वरूप स्पष्ट करा

४) भारताच्या परराष्ट्र धोरणाची प्रभावित करणारे घटक सांगा

**प्र.७ खालील एका प्रश्नांचे उत्तर दिलेल्या मुद्यांच्या आधारे स्पष्ट करा** **१०**

१) सुशासनाची मूल्ये सविस्तर स्पष्ट करा.

अ) सहभागात्मक ब) पारदर्शकता क) प्रतिसादात्मक ड) उत्तरदायित्व

**किवा**

२) जागतिकीकरणामुळे विविध क्षेत्रात झालेले बदल पुढील मुद्यांच्या आधारे स्वष्ट करा

अ) आर्थिक क्षेत्रातील बदल ब) सामा. व सांस्कृतिक बदल

क) तंत्रज्ञान क्षेत्रातील बदल ड) विचारप्रणालीबदल

---

## नमुना उत्तर पत्रिका

इयत्ता – १२ वी कला विषय :- **राज्यशास्त्र-(४२)** वेळ:३ तास एकूण गुण - ८०

**प्र. १ अ योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा** **०५**

१) महाराष्ट्र

२) ३७०

३) २१५

४) इजिप्त

५) सुशासन

**ब) खालील पैकी गटातील चुकीची जोडी दुरूस्त करून पुन्हा लिहा** **०३**

१) बिगर राजकीय अभिकर्ते – स्वयं सेवी संघटना

२) युरोप – युरोपियन युनियन

३)  पारदर्शकता - सुशासन

**क)  योग्य कारण निवडून विधान पूर्ण करा**  **०४**

१)  अ) रशिया, चीन, भारत या प्रदेशांचे प्रस्थ वाढले

२)  ब) माहितीचे संग्रहन, माहितीची उपलब्धता आणि माहितीचे वहन विनाविलंब होते

३)  क) ते देश बहुवांशिक, बहुधर्मीय, बहुसांस्कृतिक आहेत

४)  ब) त्या काळात गुंतवणुकीवर सरकारी नियकांचे अडथळे होते

**ड)  दिलेल्या विधानांकरीता समर्पक संकल्पना लिहा**  **०४**

१)  सोफ्टपॉवर

२)  दहशतवाद

३)  प्रधानमंत्री कोशल विकास योजना

४)  बहुराष्ट्रीय कंपनी

**इ)**  **०४**


१)  शिक्षण

२)  ग्रामोफोन

३)  राष्ट्रवाद

४)  विमानतळ

**प्र .२  अ)  संकल्पना चित्र पूर्ण करा.**  **०४**



**ब)** **पुढील नकाशाचे निरीक्षण करून त्या पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा** **०५**

**१)फिनलंड ,बेलारूस , युक्रेन ,एस्टोनिया ,लाट्विया**

**२) भूमध्य समुद्र ,**

**३)युक्रेन ,बल्गेरिया ,रुमानिया**

**४) फ्रांस ,जर्मनी ,इटली**

**५) बेलारूस , एस्टोनिया ,लाट्विया ,लिथुआनिया**

**प्र.३** **खालील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा. (कोणतेही पाच)** **१०**

१) हे विधान बरोबर आहे ,कारण या संघटने द्वारे भारत आर्थिक ,सामाजिक ,सांस्कृतिक ,वैद्यानिक ,संबंध या भागातील देशांशी दृढ करू शकतो

२) हे विधान बरोबर आहे ,कारण महिलांवरील अन्याय ,अत्याचार थांबवण्यासाठी तसेच पिडीत ,शोषित महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी महिला आयोगाची स्थापना करण्यात आली

३) हे विधान बरोबर आहे ,कारण जागतिकीकरणाच्या वाढत्या स्पर्धेत छोटे शेतकरी ,दुकानदारवर्ग टिकू शकत नाही

४) हे विधान चूक आहे ,कारण सागरमाला ही बंदराधारित योजना आहे

५) हे विधान बरोबर आहे ,कारण स्वातंत्र चळवळी मुळेच सर्व भारतीय धर्म जात प्रांत भाषा हे सर्व भेद विसरून एकत्र आले व पारतंत्र्याविरुध्द ताकदीने लढा दिला

६) हे विधान बरोबर आहे ,कारण शांततापूर्ण सहजीवन व आंतरराष्ट्रीय विवादाचे शांततामय मार्गाने निराकरण करणे या वर भारताचा विश्वास आहे व कोणत्याही लष्करी गटात सहभागी होण्यास भारताचा विरोध होता

७) हे विधान चूक आहे ,कारण मेल्टिंगपॉट ही संकल्पना अमेरिकन समाजाचे वर्णन करण्यासंदर्भात वापरली जाते

**प्र.४** **खालील विधानांचा सह संबंध स्पष्ट करा. (कोणतेही तीन)** **०९**

१)
1. भारतात सुशासनाच्या निर्मितीसाठी ई प्रशासनाचा स्वीकार करण्यात आला.
2. माहिती व संपर्क तंत्रज्ञानाने कार्यक्षम पद्धतीने माहिती साठवली जाते व हवी तेव्हा ती परत मिळवता येते.
3. याद्वारे शासनाच्या कार्यपद्धतीला वेग येतो निर्णय त्वरित व न्यायपूर्ण पद्धतीने होतात.
4. भ्रष्टाचाराला आळापासून कामकाजातील पारदर्शकता वाढते.
5. विविध सेवा कागदपत्रे ऑनलाईन सहज मिळवता येतात त्यामुळे प्रशासन जनतेच्या जवळ येते.

२)
1. दुसऱ्या महायुद्धानंतर जगमेरिका व सोवियत युनियन या दोन भागातात विभागले गेले.
2. जगातील बहुतांश देश या दोघींपैकी एका गटात सामील होऊ लागले.
3. आशिया आफ्रिका या खंडातील नव्याने स्वतंत्र झालेल्या देशांना लगेचच एखाद्या गटात सामील होणे म्हणजे परत पारतंत्र्य पत्करल्यासारखे होते.
4. यातून मार्ग म्हणून या दोन्ही महासत्तांपैकी कोणाही एकाच्या नेतृत्वाखालील लष्करी कराराचा भाग होण्यास काही राष्ट्रांनी नकार दिला.

5. या राष्ट्रांनी स्वतःचा एक गट स्थापन करून त्याला अलिप्ततावादी गट असे नाव दिले.
6. या गटाद्वारे दोन्ही महासत्तांपासून ते समान अंतर राखून होते..

३) 1. गरिबीच्या पारंपारिक दृष्टिकोनात अन्न वस्त्र निवारा पाणी स्वच्छता इत्यादी अभावावर भर दिला जातो जर व्यक्ती त्या मूलभूत गरजा भागवू शकत नसेल तर तो गरीब समजतात.
2. गरीबी ही संकल्पना व्यक्तीच्या उत्पन्नावर लक्ष केंद्रित करते लोकांना जगण्यासाठी लागणाऱ्या मूलभूत गरजांच्या पुरवठा करण्याची जबाबदारी राज्याने घ्यावी लागते.
3. विकासाचा अपारंपारिक दृष्टिकोन गरिबीच्या भौतिक व आधिभौतिक घटकांना महत्त्व देतो.
4. सद्यस्थितीत राज्याचे प्रमुख कार्य औद्योगिकीकरण साधून किंवा शेतीवर भर देऊन विपुलता वाढविणे हे आहे.
5. यातून रोजगार निर्मिती व दरडोई उत्पन्नाची वाढ अपेक्षित आहे

४) 1. जागतिक स्तरावर प्रसारमाध्यमात झालेली क्रांती व इंटरनेटची सेवा उपलब्धी यामुळे जगात कोठे काय घडते हे लोकांना जाणून घेता येते.
2. लोकांचे देशांतर्गत व देशाबाहेर फिरण्याचे प्रमाण वाढल्याने त्याचा समाजावर व संस्कृतीवर परिणाम होतो.
3. वैश्विक कॉस्मोपोलिटीन संस्कृती उदयाला येते.
4. लोकांच्या खाण्यापिण्याच्या सवयी बदलल्या जसे नूडल्स पिझ्झा फास्ट फूड प्रमाण वाढले आहे.
5. मदर्स डे रोज डे अशा नवीन कल्पना पुढे येत आहे.
6. शहरीकरणाने पारंपारिक कुटुंब पद्धतीत बदल झाला आहे..

**प्र.५ खालील विषया वर तुमचे मत २५ते३० शब्दांत मांडा. (कोणतेही तीन ) १२**

१)

२)

३) **या प्रश्नातील प्रत्येक उपप्रश्नासाठी शिक्षकांनी विषयानुसार विद्यार्थ्यांची मते लक्षात घ्यावी व त्यानुसार गुणदान करावे .**

४)

५)

**प्र .६ खालील प्रश्नांची ८०ते१०० शब्दांत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) १०**

१) i)१९५४ मध्ये व्यापार व सहकार्य करार

ii)'नेफा' प्रदेश वाद

iii)१९६२ भारत चीन युध्द

iv) २१व्या शतकातील बदलते संबंध

२) i)एक ध्रुवियतेचा उदय

ii) शीतयुद्धाचा शेवट

iii)नव्या राष्ट्रांचा उद्य

iv)बहु ध्रुवियता व प्रादेशिकवाद

३) व्याख्या:

**विद्यार्थ्यांनी विविध दहशतवादी कृत्ये माहिती लिहावी.**

४) i)भौगोलिक घटक

ii)ऐतिहासिक घटक

iii)आर्थिक घटक

iv)राजकीय घटक

v)आंतरराष्ट्रीय घटक

**प्र.७ खालील एका प्रश्नांचे उत्तर दिलेल्या मुद्यांच्या आधारे स्पष्ट करा** **१०**

१)

**प्रश्नपत्रिकेतील दिलेल्या मुद्यांच्या आधारे विद्यार्थ्यांनी उत्तर लिहिणे अपेक्षित आहे.**

२)

-----------------------------------------------------------------

## नमुना प्रश्न व उत्तर पत्रिका

इयत्ता – १२ वी   कला     विषय :- राज्यशास्त्र-(४२)     वेळ: ३ तास     एकूण गुण - ८०

-----------------------------------------------------------------------------------------------

**प्रश्न क्रमांक** 1अ) योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा .

1) शीतयुद्ध अमेरिका व---- या दोन देशां दरम्यान होते.

(फ्रान्स, भारत, सो युनियन , जपान)

उत्तर :- सो युनियन

2) फ्रान्सिस फुकू यामा यांनी --- हा सिद्धांत मांडला.

(इतिहासाचा अंत, सॉफ्ट पॉवर, हार्ड पॉव , इतिहासाची सुरुवात)

उत्तर :- इतिहासाचा अंत

3) -------हे दशक मानवी हस्तक्षेपाचा सुवर्णकाळ म्हटले जाते..

(1990,1995, 2000,2001)

उत्तर :- 1990

4) ------हा दिवस जागतिक मानवी हक्क दिन म्हणून साजरा केला जातो..

(10 डिसें, 26 जाने, 15मार्च,8 सप्टेंबर)

उत्तर :- 10 डिसें

5) -----हे युरोपियन युनियनचे अधिकृत चलन आहे.

(डॉलर,युरो ,रुपयेदिनार)

उत्तर :- युरो

6) शेंगेन युरोपियन  विसा---देशांमध्ये चालतो.

(26,30, 10,05)

उत्तर :- 26

7) सार्क संघटनेचे सचिवालय----येथे आहे.

(श्रीलंका, काठमांडू, भारत, इस्लामाबाद)

उत्तर :- काठमांडू

प्रश्न क्रमांक 1**ब)** चुकीची जोडी दुरुस्त करून पुन्हा लिहा.

1)ब्रिक्स-- रशिया

2) बांगलादेश--जी 20

3) शांघाय सहकार्य संघटना—चीन

उत्तर :- बांगलादेश –सार्क

प्रश्न क्रमांक 1**क) दिलेल्या विधानाकरता समर्पक संकल्पना लिहा**

1)जेव्हा एक राज्य इतर राज्यांवर लष्करी ताकतीच्या वापराशिवाय प्रभाव पाडते----

उत्तर :- सोफ्ट पावर

2)समाजात भीती धास्ती घबराट निर्माण करण्यासाठी हिंसाचाराचा केलेला वापर---

उत्तर :- दहशतवाद

3)जेव्हा एक राज्य इतर राज्यांवर लष्करी बळाच्या वापराने प्रभाव पाडते---

उत्तर :- हार्ड पावर

4)वन बेल्ट वन रोड हा प्रकल्प राबवणारा देश---

उत्तर :-चीन

5)युरोपमध्ये सर्वत्र वापरला जाणारा व्हिसा ----

उत्तर :-शेंगेन व्हिसा

---

प्रश्न क्रमांक 3 खालील विधाने चूक की बरोबर सकारण स्पष्ट करा.

1)1980 च्या दशकाला मानवतावादी हस्तक्षेपाचा सुवर्णकाळ म्हणतात.

उत्तर :- चूक 1990 च्या दशकाला मानवतावादी हस्तक्षेपाचा सुवर्णकाळ म्हणतात.

2)दक्षिण आशियातील व्यापारासाठी सार्क महत्त्वाचे आहे.

उत्तर :- बरोबर दक्षिण आशियात संवाद निर्माण करण्यासाठी सार्कची निर्मिती करण्यात आली.

3)दहशतवाद संपूर्ण जगासाठी डोकेदुखी ठरलेला आहे.

उत्तर :- बरोबर दहशतवादामुळे राष्ट्रीय एकात्मता स्वातंत्र्य व आर्थिक स्थार्य धोक्यात येते व सरकारची मोठी शक्ती व पैसा त्याविरुद्ध लढण्यात खर्च होतो.

प्रश्न क्रमांक 6**खालील प्रश्नांची 80 ते 100 शब्दात उत्तरे लिहा.**

1) शीतयुद्ध समाप्तिनंतर जगावर झालेले परिणाम लिहा?

---

प्रश्न क्रमांक **1** अ)  योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा **.**

1) साम्यवादी बाजारपेठीय अर्थव्यवस्था ही संकल्पना -----या देशासंदर्भात वापरली जाते.

( भारत ,चीन, फ्रान्स, अमेरिका)

उत्तर :- चीन

2) तंत्रज्ञानातील सर्वात महत्त्वाची क्रांती---- ही आहे.

( संगणक ,फेसबुक ,इंटरनेट,  व्हाट्सअप)

उत्तर :- इंटरनेट

प्रश्न क्रमांक **1** ब) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य कारण निवडून विधाने पूर्ण करा..

1) 1990 च्या दशकापूर्वी भांडवली गुंतवणुकीचा मुक्त संचार झाला नाही कारण,

अ) त्याकाळी सरकारी नियमांचे अडथळे होते

ब) त्याकाळी भांडवलाचे प्रमाण कमी होते

क) बँकांचा विस्तार झाला नव्हता

ड) तो शीतयुद्धाचा परिणाम होता.

उत्तर:- अ)  त्याकाळी सरकारी नियमांचे अडथळे होते

प्रश्न क्रमांक **1 क)** गटात न बसणारा शब्द ओळखा..

१) मोबाईल, सॅटेलाईट, इंटरनेट ,ग्रामोफोन.
   उत्तर :- ग्रामोफोन
२) कॉपीराईट, ट्रेडमार्क, पेटंट, ट्विटर.
   उत्तर :- ट्विटर.

प्रश्न क्रमांक 3 खालील विधाने चूक की बरोबर सकारण स्पष्ट करा.

1) जागतिकीकरणाने बाजारपेठीय अर्थव्यवस्था ही संकल्पना आणली.
   उत्तर :- बरोबर  , जागतिकीकरणामुळे मुक्त बाजार अर्थ व्यवस्था स्वीकारण्यात आली.
2) जागतिकीकरणात बिगर सरकारी संस्थांचे महत्त्व कमी झाले.
   उत्तर:- चूक  , उलट पक्षी जागतिकीकरणामध्ये सामाजिक संस्था एनजीओ यांचे योगदान दिवसेंदिवस वाढत आहे.

प्रश्न क्रमांक 4सहसंबंध स्पष्ट करा..

1) जागतिकीकरण व संस्कृती.

- जागतिक स्तरावर प्रसारमाध्यमात झालेली क्रांती व इन्टरनेट ची सेवा उपलब्धी यामुळे जगात कोठे काय घडते हे लोकांना जाणून घेता येते.
- लोकांचे देशांतर्गत व देशाबाहेर फिरण्याचे प्रमाण वाढल्याने त्यांचा समाजावर व संस्कृतीवर परिणाम होतो.
- वैश्विक कॉस्मोपोलेटीयन संस्कृती उदयाला येते.
- लोकांच्या खाण्यापिण्याच्या सवयी बदलल्या जसे न्युडल्स, पिझ्झा फास्ट फूड इ. चे प्रमाण वाढले आहे .
- मदर्सडे, रोजडे अशा नवीन कल्पना पुढे येत आहे.
- शहरी करणाने पारंपारिक कुटुंब पद्धतीत बदल झाला आहे.

प्रश्न क्रमांक7 खालील प्रश्नाचे दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सविस्तर उत्तर लिहा.

1) जागतिकीकरणामुळे विविध क्षेत्रात झालेले बदल पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करा..

1) आर्थिक क्षेत्रातील बदल

2) सामाजिक व सांस्कृतिक बदल

3) तंत्रज्ञान क्षेत्रातील बदल

4) विचार प्रणालीतील बदल

### पुनर्परीक्षार्थीसाठी अध्ययन साहित्य

**इयत्ता :-१२वी कला** **विषय :-राज्यशास्त्र**

**प्रकरण तिसरे :- 1991 नंतरच्या महत्त्वाच्या संकल्पना आणि समस्या मानवतावादी प्रश्न**

---

प्र.१ ) (अ) कंसातील योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा

१) -----साली स्टॉक होम येथे संयुक्त राष्ट्राची मानवी पर्यावरण परिषद झाली.

(1972 , 1983, 1992 ,2002)

उत्तर:- 1972

२) निती आयोगाची स्थापना---साली करण्यात आली.

(1950, 1960 , 1992 ,2015)

उत्तर:-2015

३)----हा अपारंपारिक ऊर्जा स्त्रोत आहे.

(अणुऊर्जा ,सोलर पॅनेल ,जलविद्युत ,औष्णिक ऊर्जा)

उत्तर:-सोलर पॅनेल

४) सन---मध्ये संयुक्त राष्ट्राचे महिला दशक सुरू झाले.

(1975 ,1976 ,1977 ,1978)

उत्तर:-1976

प्र. १ (ब) खालीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून पुन्हा लिहा.

1) (अ) नियोजन आयोग- 1947

(ब) निती आयोग - 2015

(क) नवीन आर्थिक धोरण- 1991

उत्तर:- नियोजन आयोग -1950

2) (अ) हवामान बदल -पर्यावरणीय समस्या

(ब) स्थलांतर- भारतातील गरिबी

(क) आर्थिक असमानता- जागतिकीकरण

उत्तर:- (ब) स्थलांतर -भारतातील ग्रामीण बेरोजगारी

प्र.१. (क) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

1) 73 वी घटना दुरुस्ती करण्यात आली, कारण...

(अ) पंचायती राज सक्षम करण्यासाठी

(ब) महिला सक्षमीकरणासाठी

(क) मतदानाची वयोमर्यादा 18 वर्षांची करण्यासाठी

उत्तर :-महिला सक्षमीकरणासाठी

(2) मार्च 1950 मध्ये भारतात नियोजन आयोगाची स्थापना करण्यात आली कारण--

अ) लोकांचे राहणीमान सुधारणे व विकास घडवून आणणे

ब) कृषी उत्पादनात वाढ करणे

क) जलद औद्योगिकीकरण करणे.

उत्तर:- लोकांचे राहणीमान सुधारणे व विकास घडवून आणणे.

प्र.१ .(ड) दिलेल्या विधानासाठी समर्पक संकल्पना लिहा.

१) बेसुमार जंगलतोड- : **नि:वृक्षिकरण**

२) भारताच्या आर्थिक व्यवस्थेचे आधुनिकीकरण-**औद्योगिकीकरण**

३) कल्याणकारी राज्यास प्रोत्साहन देणे- **समाजवाद**

प्र.१ (इ) गटात न बसणारा शब्द ओळखा व लिहा.

(१) हवामान बदल ,प्रदूषण ,दारिद्र्य ,जंगलतोड

उत्तर:-दारिद्र्य (ही पर्यावरणाशी निगडित समस्या नाही)

(२) आर्थिक असमानता, लैंगिक शोषण, स्वातंत्र्याचा अभाव, कमी साक्षरता.

उत्तर:-स्वातंत्र्याचा अभाव (भारतातील महिलांची समस्या नाही.)

प्र.३) खालील विधाने बरोबर की चूक ते सकारण सांगा.

१) राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना महिला हक्क संरक्षणासाठी करण्यात आली.

उत्तर:-वरील विधान बरोबर आहे.

कारण महिलांच्या हक्कांचे व कायदेशीर बाबींचे संरक्षण करण्याची ग्वाही राष्ट्रीय महिला आयोगाच्या स्थापनेच्या वेळी देण्यात आली .

२) सक्षमीकरणामुळे दुर्बल घटकांचा विकास होतो.

उत्तर:-वरील विधान बरोबर आहे कारण सक्षमीकरण या प्रक्रियेद्वारे दुर्बल घटकांना स्वतःच्या आयुष्यावर ताबा मिळवता येतो यामुळे स्वतःच्या मूलभूत गरजा त्यांना भागवता येतात त्यांचा विकास होतो.

प्र.४) खालील विधानांचा सहसंबंध स्पष्ट करा.

1) भारतीय समाज -स्त्री-पुरुष विषमता

उत्तर:-भारतीय समाज पुरुष प्रधान व परंपरेवर विश्वास ठेवणारा आहे .धार्मिक ,सामाजिक रूढी ,परंपरा, प्रथा याद्वारे स्त्रियांवर अन्यायकारक निर्बंध लादले गेले आहेत भारतात स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार 19 व्या शतकात प्राप्त झाला.

2) स्टॉकहोम परिषद आणि पर्यावरण संरक्षण

उत्तर:-1972 साली स्टॉकहोम येथे संयुक्त राष्ट्रांच्या मानवी पर्यावरण विषयक परिषदेत पहिल्यांदाच आर्थिक विकास आणि पर्यावरणाचा ऱ्हास यांच्यातील संबंधाचा विचार आंतरराष्ट्रीय स्तरावर केला गेला .या परिषदेचा मुख्य हेतू पर्यावरणाचे संरक्षण आणि त्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी देशांना प्रोत्साहन देणे आणि मार्गदर्शन करणे असा होता.

प्र. ५) खालील विषयावर तुमचे मत 25 ते 30 शब्दात मांडा.

1) पर्यावरण ही संकल्पना स्पष्ट करा.

उत्तर:-पर्यावरण म्हणजे आपल्या अवतीभवती असणारे वातावरण, आपण ज्यामुळे श्वास घेतो ती हवा पृथ्वीचा बहुतांश भाग व्यापणारे पाणी,प्राणी इत्यादी.

पर्यावरण म्हणजे ज्या वातावरणामध्ये माणूस ,प्राणी आणि वनस्पती राहतात नैसर्गिकरित्या आढळणाऱ्या सर्व सजीव आणि निर्जीव गोष्टी मिळून नैसर्गिक पर्यावरण बनते यामध्ये माती,हवा, पाणी ,खडक, हवामान इत्यादींचा समावेश केला जातो.

प्र. ७) खालील प्रश्नाचे उत्तर दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सुमारे 150 ते 200 शब्दात स्पष्ट करा.

1) भारतातील महिलांची स्थिती

१) आर्थिक असमानता

२) तस्करी आणि शोषण

३) साक्षरतेचे प्रमाण

४) राजकीय प्रतिनिधित्व

उत्तर :-भारताच्या संविधानातील उद्देशिका ,मूलभूत तत्वे, मूलभूत कर्तव्य आणि मार्गदर्शक तत्त्वांमध्ये लिंगभाव समानतेचे तत्व समाविष्ट केले गेले आहे. असे असूनही महिलांना सतत भेदभावाला सामोरे जावे लागते .भारतातील महिलापुढील काही समस्या खाली दिल्या आहेत.

१) आर्थिक असमानता:-

भारतातील सगळयात मोठ्या समस्या पैकी एक समस्या म्हणजे स्त्री-पुरुषांमधील वेतनातील दरी ,त्याचबरोबर श्रमिकांच्या बाजारपेठेतील महिलांची टक्केवारी 28.2% इतकी कमी आहे तर तुलनेने पुरुष 78 .8 टक्के आहेत.

२) तस्करी आणि शोषण:-

2013 साली संयुक्त राष्ट्र मादक पदार्थ आणि गुन्हे विभागाने सादर केलेल्या अहवालात भारतातील महिलांचे जबरदस्तीने विवाह करण्यासाठी तस्करी केली जात असल्याचे म्हटले आहे. यात पुढे असे नमूद केले आहे की , त्यांचे बहुतेक वेळा शोषण केले जाते त्यांची मूलभूत हक्क डावलले जातात त्यांना मोलकरीण म्हणून राबवून घेण्यात येते आणि कालांतराने परित्यक्त केले जाते.

३) साक्षरतेचे प्रमाण:- भारतातील महिलांचे साक्षरतेचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत कमी आहे. 2011 च्या जनगणनेच्या अहवालानुसार पुरुषांमधील साक्षरतेचे प्रमाण 82.14% आहे तर महिलांमधील प्रमाण 65.46% आहे.

४) राजकीय प्रतिनिधित्व:- भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून संसदेत आणि राज्यातील विधानमंडळामध्ये महिलांचे असलेले अत्यल्प प्रमाण ही समस्या राहिलेली आहे.

## प्रकरण चार:- समकालीन भारत: शांतता, स्थैर्य आणि राष्ट्रीय एकात्मतेसमोरील आव्हाने

==================================================================

**प्रश्न १) (अ) कंसातील योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

**1)** चारू मुजुमदार-----शी निगडीत आहे.

(JKLF, नक्षलवादी चळवळ, हिजबुल मुजाहिद्दीन, आसाम तेल कोंडी)

**उत्तर:- नक्षलवादी चळवळ**

**2)** राष्ट्रवाद ही ----निर्माण होण्याची भावना आहे.

(स्वातंत्र्य, राज्य ,राजकीय अस्मिता, राष्ट्र)

**उत्तर:- राजकीय अस्मिता**

**3) Melting pot** ही संकल्पना----समाजाच्या संदर्भात वापरली जाते.

(अमेरिकन, भारतीय, इंग्लिश, फ्रेंच)

**उत्तर :-अमेरिकन**

**4)** राजीव गांधी यांची हत्या सन---- मध्ये झाली.

(1988, 1989,1990,1991)

**उत्तर: 1991**

प्र.१.(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून पुन्हा लिहा.

अ) जवाहरलाल नेहरू- डिस्कवरी ऑफ इंडिया

ब) तामिळ लोकांच्या हक्कासाठी लढा-LTTE

क) राष्ट्रीय एकात्मता परिषद -कलम 370

**उत्तर - राष्ट्रीय एकात्मता परिषद 1961**

**प्र.१** (क) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

1) जम्मू काश्मीर भारतासमोर असलेली एक गंभीर समस्या आहे कारण---

अ) सीमेपलीकडील दहशतवाद सक्रिय आहे.

ब) लोकांना आझादी हवी आहे.

क) राज्य शासन अकार्यक्षम आहे.

**उत्तर:-सीमेपलीकडील दहशतवाद सक्रिय आहे.**

प्र.(ड) दिलेल्या विधानासाठी समर्पक संकल्पना लिहा.

1) लोकांचा राज्याच्या निर्णय प्रक्रियेतील सहभाग-

उत्तर **:-सहभागयुक्त लोकशाही**

**2)** सर्व प्रौढ नागरिकांना मताधिकार-

**उत्तर :-सार्वत्रिक मताधिकार**

**प्र.१ (**इ) गटात न बसणारा शब्द ओळखा व लिहा.

(१) दहशतवाद ,नक्षलवाद ,राष्ट्रवाद ,उग्रवाद

**उत्तर :-राष्ट्रवाद (अतिरेकी मार्गाचे समर्थन करत नाही.)**

(२) राष्ट्रगीत ,राष्ट्रीय नेता ,राष्ट्रीय पक्षी ,राष्ट्रीय प्राणी-

**उत्तर :-राष्ट्रीय नेता**

**प्र.** ३ खालील विधाने बरोबर की चूक ते सकारण सांगा.

1) पंजाब मध्ये शासनाला लष्करी बळाचा वापर करावा लागला.

**उत्तर :-वरील विधान बरोबर आहे कारण पंजाब मध्ये खलिस्तान राज्याची मागणी करण्यात आली त्यासाठी फुटीरतावादी अथवा अलगवादी आंदोलन करण्यात आले.**

2) भारतीय स्वातंत्र्य चळवळ राष्ट्रीय एकात्मतेसाठी पोषक ठरली.

**उत्तर :-वरील विधान बरोबर आहे कारण परकीय राजवटी पासून स्वातंत्र्य प्राप्त करण्यासाठी सर्व भारतीय जनता एकत्र आली ही भावना राष्ट्रीय एकात्मतेस पोषक आहे.**

प्र.५) खालील विषयावर तुमचे मत 25 ते 30 शब्दात मांडा.

1) दहशतवाद हे असममित युद्धतंत्र आहे.

**उत्तर :-विशिष्ट प्रदेशातील ,विशिष्ट जाती व जमातीच्या लोकसमूहाने आपल्या मागण्यासाठी केलेला संघर्ष हे देशातील सरकारविरुद्धचे अघोषित युद्ध आहे. हे युद्ध राज्याच्या विरुद्ध असते. श्रीलंकेच्या सरकारविरुद्ध एलटीटीई ही श्रीलंकेतील दहशतवादी संघटना कार्य करत होती.हिंसाचाराचा वापर करून दहशत निर्माण केली जाते.**

प्र. ६. खालील प्रश्नाचे उत्तर 80 ते 100 शब्दात लिहा.

1) आधुनिक काळात राज्याची भूमिका कोणती असावी सविस्तर चर्चा करा.

**उत्तर:- प्रगतीसाठी शांतता ,स्थैर्य आणि नागरी सुव्यवस्था यांची नितांत गरज असते. नागरिकांच्या जीवनमानाचा दर्जा हा प्रामुख्याने सुव्यवस्थेवर अवलंबून असतो. शांतता स्थैर्य आणि राष्ट्रीय एकात्मता यामधील आधुनिक काळात राज्याची भूमिका खालील मुद्द्यावरून स्पष्ट करता येईल.**

१) शांतता आणि सुव्यवस्था राखणे:-

**उत्तर: राज्य समाजात शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित करते. राज्याचा मूळ हेतू देशाचे संरक्षण करणे हा आहे .देशाचे संरक्षण करणे ,संविधान आणि राजकीय व्यवस्था टिकवणे ही राज्याची जबाबदारी असते.**

२) आर्थिक प्रगती:-

**उत्तर:देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी राज्याने प्रयत्नशील असणे अपेक्षित आहे.आर्थिक स्थैर्य आणि आर्थिक विकास यातून लोकांचे आर्थिक हित साध्य करता येते.**

३) राष्ट्र उभारणी:-

**उत्तर:समाजातील विविधतेमुळे राज्याचे विघटन होणार नाही याची दक्षता राज्याने घ्यावयाची असते.**

४) शासन:-

**उत्तर:राज्याची प्राथमिक जबाबदारी राज्यकारभार करणे ही आहे. लोकांचा राज्याच्या निर्णय प्रक्रियेमधील सहभाग घडवून आणणे हे सुशासनाचे लक्षण आहे.**

५) लोककल्याण:-

**उत्तर:सामाजिक न्याय, वाजवीपणा समानता या तत्त्वांचा वापर लोककल्याणासाठी करणे ,समाजातील असमतोल दूर करणे ,दुर्लक्षित घटकांचा विकास घडवून आणणे ही राज्याची महत्त्वाची जबाबदारी आहे.**

**प्रकरण पाचवे:-समकालीन भारत : सुशासन**

==================================================================

**प्र.१) (अ)** कंसातील योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा

1) भारतात माहितीचा अधिकार हा कायदा सन ----पासून लागू झाला.

(1952 ,1972, 2005 ,2014)

उत्तर:- **2005**

**2)** **-----** हे सुशासनाचे महत्त्वाचे मूल्य आहे.

(कायद्याचे राज्य, स्वतंत्र न्यायपालिका, सकारात्मक भेदभाव, सक्षमीकरण)

उत्तर:-**कायद्याचे राज्य**

**3)** प्रशासन ही संकल्पना शासन या संकल्पनेपेक्षा--- आहे.

(मर्यादित ,व्यापक ,संकुचित, विस्तारित)

उत्तर:- **व्यापक**

**4)** लोकायुक्त ही संकल्पना राबवणारे-----हे देशातील पहिले राज्य आहे.

(राजस्थान ,हरियाणा ,महाराष्ट्र, पंजाब)

उत्तर:- **महाराष्ट्र**

प्र.१ (ब) खालील गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून पुन्हा लिहा.

1) अ) माहितीचा अधिकार कायदा - 2005

ब) लोकपाल कायदा -2013

क) महाराष्ट्र लोकायुक्त कायद -2013

**उत्तर:-क) महाराष्ट्र लोकायुक्त कायदा-1972**

प्र.१ (क) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

1) पारंपारिक प्रशासन अकार्यक्षम होते; कारण----

अ) ते भ्रष्टाचार आणि लाल फितीत अडकलेले होते.

ब) कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण अपुरे होते.

क) कर्मचाऱ्यांची गुणवत्ता कमी दर्जाची होती.

उत्तर:- **ते भ्रष्टाचार आणि लाल फितीत अडकलेले होते.**

**2)** ई-शासनामुळे शासकीय कामांचा वेग वाढला आहे; कारण---

अ) ते यांत्रिक आहे.

ब) माहितीचे संग्रहण, माहितीची उपलब्धता आणि माहितीचे वहन विना विलंब होते.

क) शासनाची प्रादेशिक व्याप्ती वाढते.

उत्तर:- **माहितीचे संग्रहण, माहितीची उपलब्धता आणि माहितीचे वहन विना विलंब होते.**

**प्र .**१) (ड) दिलेल्या विधानासाठी समर्पक संकल्पना लिहा.

1) संपर्क तंत्रज्ञानावर आधारित प्रशासन-

उत्तर:-**ई -प्रशासन**

**2)** कायद्यासमोर सर्व व्यक्ती समान असणे-

उत्तर:- **कायद्याचे राज्य**

**3)** अकार्यक्षम आणि भ्रष्ट शासन -

उत्तर:-**पारंपरिक प्रशासन**

प्र.(इ) गटात न बसणारा शब्द ओळखा व लिहा.

1) पारदर्शकता , उत्तरदायित्व, कार्यक्षम व परिणामकारक,

कल्याणकारी.

उत्तर:- **उत्तरदायित्व (हे पारंपरिक प्रशासनाचे वैशिष्ट्य नाही)**

**2)** सहभागयुक्त ,कायद्याचे राज्य ,कायदा आणि सुव्यवस्था, प्रतिन्यायालय

उत्तर:-**कायदा आणि सुव्यवस्था (हे सुशासनाचे वैशिष्ट्य नाही.)**

प्र. ३. खालील विधाने बरोबर की चूक ते सकारण सांगा.

1) भारतात लोकपाल व लोकायुक्त या अधिकार पदांची निर्मिती करण्यात आली.

उत्तर:- **वरील विधान बरोबर आहे. कारण प्रशासकीय भ्रष्टाचारावर नियंत्रण प्रस्थापित करणे आवश्यक होते.**

**2)** पारंपरिक प्रशासन कार्यक्षम होते.

उत्तर,:-**वरील विधान चूक आहे .कारण त्यातील दप्तर दिरंगाई व भ्रष्टाचार यामुळे हे प्रशासन अकार्यक्षम होते.**

**प्र.४.** खालील विधानाचा सहसंबंध स्पष्ट करा.

1) सुशासन आणि ई- प्रशासन.

उत्तर:-**सुशासन आणि ई-प्रशासन यांचे संबंध घनिष्ठ आहेत. माहितीच्या अधिकारामुळे नागरिकांना अतिशय जलद गतीने माहिती उपलब्ध होते. नागरिकांच्या तक्रारी ,सूचना यांची दखल शासनाला त्वरित घ्यावी लागते. आणि त्यानुसार उचित निर्णय घ्यावे लागतात. प्रशासनात पारदर्शकता येऊन नागरिकाप्रती शासनाचे उत्तरदायित्व प्रस्थापित होत.**

**प्र.**६.खालील प्रश्नाचे उत्तर 80 ते 100 शब्दात लिहा.

1) दुसऱ्या प्रशासकीय सुधारणा आयोगाने भारतीय प्रशासनात कोणत्या सुधारणा सुचवल्या होत्या?

उत्तर:- **दुसऱ्या प्रशासकीय सुधारणा आयोगाने पुढील प्रशासकीय सुधारणा सुचवल्या होत्या:**

**१) लोकांना अधिकार देणारे कायदे करणे.**

**२) नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करणारी संस्थात्मक यंत्रणा उभारणे.**

**३) नागरिकांना मिळणाऱ्या सेवांमध्ये सुधारणा व्हावी यासाठी नागरिकांना सोयीस्कर ठिकाणी कार्यालयांची स्थापना करणे.**

**४) संस्थेअंतर्गत शिस्तपालन सुधारणे.**

**५) प्रशासनाची कार्यक्षमता वाढवण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करणे**

**६) प्रशासकीय निर्णय प्रक्रिया मध्ये सुलभता आणणे.**

**७) नियमन आणि नियंत्रण कमी करणे.**

**८) चांगली कामगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सन्मानित प्रोत्साहित करणे.**

**प्र.**७. खालील प्रश्नाचे उत्तर दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सुमारे 150 ते 200 शब्दात स्पष्ट करा.

1)सुशासनाच्या पुढे दिलेल्या मूल्यांचे सविस्तर विवरण करा.

१) कायद्याचे राज्य

२) सहमती दर्शक

३) समता आणि समावेशकता

४) परिणामकारकता आणि कार्यक्षमता

**उत्तर:-सुशासन हा नवा दृष्टिकोन म्हणून ओळखला जातो. हा दृष्टिकोन राज्यसंस्था आणि नागरी समाज यांच्यातील आंतरसंबंधाचा विचार करतो हा दृष्टिकोन प्रशासन हे नियमांनी बांधलेले न राहता ते नागरिक केंद्री होण्याची गरज प्रतिपादित करते. सुशासनाची विविध मूल्ये पुढील मुद्द्यावरून स्पष्ट होतील .**

**१) कायद्याचे राज्य:-**

**संविधान म्हणजे देशाच्या सर्वोच्च कायद्याचे राज्य हे सुशासनाचे दुसरे महत्त्वाचे मूल्य आहे. संविधानातील मूल्ये प्रशासनाला मार्ग दाखवण्याचे कार्य करतात . कायद्यासमोर सर्वांना समानतेची वागणूक मिळते. न्याय्य आणि योग्य राज्य व्यवस्थेत लोकांच्या हक्कांची हमी दिली जाते.**

**२) सहमतीदर्शक:-**

**प्रत्येक समाजात कोणत्याही मुद्द्यावर वेगवेगळे दृष्टिकोन आढळतात .सुशासनामध्ये समाजातील विविध घटकांमध्ये सुसंवाद होणे अभिप्रेत आहे. यामुळे संपूर्ण समाजाचे हित कशात आहे आणि ते कसे साध्य करता येईल त्याबाबत एक व्यापक सहमती तयार करण्यास मदत होते.शाश्वत मानवी विकास घडून आणण्यासाठी ची उद्दिष्टे कशी साध्य करता येतील याबाबतही व्यापक आणि दीर्घकालीन दृष्टिकोन स्वीकारता येतो.**

**३) समता आणि समावेशकता:-**

**समाजाचे हित हे सर्व सदस्यांच्या मनात आपण या समाजाचे भाग आहोत ही भावना रुजवण्यावर अवलंबून असते. कोणाच्याही मनात आपण समाजाच्या मुख्य प्रवाहापासून बाजूला आहोत ही भावना नसावी. यासाठी सर्व गटांना विशेषतः दुर्बल घटकांचे हीत साध्य करण्याकरता आणि सुधारणा करण्यासाठी त्यांना संधी दिली जावी.**

**४) परिणामकारकता आणि कार्यक्षमता:-**

**सुशासन म्हणजे समाजातील संस्थांनी आणि प्रक्रियांनी साधन संपत्तीचा सुयोग्य वापर करून समाजाच्या गरजा पूर्ण करणे .सुशासनात अंतर्भूत असलेली कार्यक्षमतेची संकल्पना म्हणजे नैसर्गिक साधन संपदेचा सुयोग्य वापर आणि पर्यावरण रक्षण होय.**

================================================================

प्रश्न क्रमांक १ अ) योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा

१) ----हा देश अलिप्तता वादाचा जनक म्हटला जातो.
( भारत, चीन, अमेरिका, फ्रान्स)
उत्तर :-भारत

२) 1962 साली भारत व--- या देशा दरम्यान युद्ध झाले.
( ब्रिटन, चीन ,पाकिस्तान, जर्मनी)
उत्तर :-चीन

३) सिमला करार पाकिस्तान व---- या देशा दरम्यान झाला.
( अमेरिका, भारत ,चीन, जपान)
उत्तर :-पाकिस्तान

४) भारताने नदी वाटपाचा फरका करार------ या देशासोबत केला.
( बांगलादेश ,नेपाळ, पाकिस्तान ,चीन)
उत्तर:- बांगलादेश

**प्रश्न क्रमांक १ ड) दिलेल्या विधानांसाठी समर्पक संकल्पना लिहा.**

१) कोणत्याही लष्करी कराराचा भाग होण्यास नकार---
उत्तर:- अलिप्ततावाद

२) बंदरे व जलमार्ग यांच्यासाठी पूरक योजना---
उत्तर :-सागरमाला

**प्रश्न.३ खालील विधाने चूक की बरोबर ते सकारण लिहा.**

१) सागर मला या योजनेत रस्त्यांचा व्यापक विकास अपेक्षित आहे.
उत्तर:- चूक ,कारण सागरमाला ही बंदराधारीत विकासाची योजना आहे.

२) भारताने अलिप्तता वादाचा मार्ग स्वीकारला.

उत्तर:- बरोबर, शांततापूर्ण सहजीवन आणि आंतरराष्ट्रीय विवादांचे शांततामय मार्गाने निराकरण करणे यावर भारताचा विश्वास आहे.

**प्रश्न क्रमांक ७ खालील प्रश्नाचे मुद्याच्या आधारे सविस्तर उत्तर लिहा.**

१) भारताच्या परराष्ट्र धोरणाला प्रभावित करणारे घटकखालील मुद्द्यांच्या आधारे सविस्तर स्पष्ट करा.

*भौगोलिक घटक

*ऐतिहासिक घटक

*आर्थिक घटक

*राजकीय घटक

*आंतरराष्ट्रीय व्यवस्था

## राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

## पुनर्परीक्षार्थीसाठी शैक्षणिकसाहित्यनिर्मिती- 2024.

## विषय:- राज्यशास्त्र

**इयत्ता:- 12वी. कला वेळ:-3 तास गुण:- 80**

---

**प्र.1** **20**

**अ) कंसातील योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** (5)

1)वांशिक राष्ट्रवादाची संकल्पना----या तत्वावर आधारित आहे.

(स्वयंनिर्णय, साम्यवाद ,लोकशाही ,भांडवलशाही)

2) साम्यवादी बाजारपेठीय अर्थव्यवस्था ही संकल्पना ----या देशासंदर्भात वापरली जाते.

(भारत ,चीन ,फ्रान्स, अमेरिका)

3) आज भारताचा लिंगभाव निगडित--- दृष्टिकोन यावर लक्ष केंद्रित करण्यात आले.

(शिक्षण, लोककल्याण, विकास, सक्षमीकरण)

4) जम्मूकाश्मीर राज्याला विशेष दर्जा देणारे कलम-----हे ऑगस्ट 2019 मध्ये रद्द करण्यात आले.

(352, 356, 370,371)

5) लोकपाल ही संकल्पना----येथून घेण्यात आली.

((अमेरिका, युनायटेडकिंगडम, स्वीडन, रशिया)

**ब) खालीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून पुन्हा लिहा.** (3)

1) अ) शीतयुद्धाची समाप्ती- पूर्वपश्चिमवादाची अखेर

ब) सोव्हिएटयुनियनचे विघटन- नवीन राष्ट्राचा उदय

क) द्विध्रुवीयता संपुष्टात आली – रशियाचे वर्चस्व प्रस्थापित झाले.

2) अ) शेती व खाणकाम- पहिले क्षेत्र

ब) उत्पादन- दुसरे क्षेत्र

क) अन्नधान्याची निर्यात- पहिले क्षेत्र

3) अ) माहितीचा अधिकार कायदा 2005

ब) लोकपाल कायदा - 2013

क) महाराष्ट्र लोकायुक्त कायदा- 2013

**(क) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** (4)

1) प्रादेशिकतावादाचा विकास झाला. कारण.......

अ) सोव्हिएट युनियनचे विघटन झाले.

ब) अमेरिकेचे वर्चस्व संपुष्टात आले.

क) व्यापारगटांचा प्रभाव वाढला.

2) मार्च 1950 मध्ये भारतात नियोजन आयोगाची स्थापना करण्यात आली कारण......

अ) लोकांचे राहणीमान सुधारणे व विकास घडवून आणणे.

ब) कृषी उत्पादनात वाढ करणे.

क) जलद औद्योगिकीकरण करणे.

3) आंतरराष्ट्रीय आर्थिक संबंध वृद्धिंगत झाले. कारण....

अ) जागतिकीकरणाचा प्रसार

ब) मोबाईल संयंत्रणेचा प्रसार

क) परदेशातून कर्जाची उपलब्धता

4) युनिलिव्हर ही एक ट्रान्स- नॅशनल कार्पोरेशन आहे. कारण....

अ) ती अनेक देशात कार्यरत आहे.

ब) ती कोणत्याही एका राष्ट्राला बांधील नाही.

क) ती सेवाक्षेत्रात कार्य करते.

**(ड) दिलेल्या विधानासाठी समर्पक संकल्पना लिहा.** (4)

1) जेव्हा एक राज्य हे इतर राज्यावर लष्करी ताकदीच्या वापराशिवाय प्रभाव पडते.....

2) अनेक देशात कार्यरत असलेली कंपनी.....

3) जास्त उत्पन्न देणाऱ्या जातीच्या बियाण्यांचा विकास, सिंचनपद्धतीचा विस्तार.....

4) समाजात भीती /घबराट/ धास्ती निर्माण करण्यासाठी हिंसाचाराचा केलेला वापर.....

**(इ) गटात न बसणारा शब्द ओळखा व लिहा.** (4)

1) सार्क संघटनेचे सदस्य देश:-

अ) भूतान ब) नेपाळ क) श्रीलंका. ड) रशिया.

2) मोबाईल, सॅटेलाइट, इंटरनेट, ग्रामोफोन.

3) अन्न, वस्त्र, निवारा, उच्चशिक्षण.

4) जवाहरलालनेहरू, इंदिरागांधी, राजीवगांधी, सोनियागांधी.

**प्र.2** (अ) खालील संकल्पना चित्र पूर्ण करा. **(4)**

------------------. -----------------

BRICS चेसदस्य

-------------------. -----------------

**(ब) खालील नकाशाचे निरीक्षण करून पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(5)**

1) शेंगेंनचे सदस्य नसलेले युरोपियन युनियनचे सदस्य असलेले तीन देशांची नावे लिहा. (3)

2)युरोपियन युनियनचे सदस्य नसलेले शेंगेनचे सदस्य असलेले दोन देशांची नावे लिहा. (2)




**प्र.3 खालील विधाने बरोबर की चूक ते सकारण सांगा.(कोणतेही पाच).** **(10)**

1) 1990 च्या दशकाला मानवतावादी हस्तक्षेपाचा सुवर्णकाळ म्हणतात.

2) जागतिकीकरणात बिगरसरकारी संस्थांचे महत्त्व कमी झाले आहे.

3) शहरातील मॉल्सच्या स्पर्धेत छोट्या दुकानदारांचा टिकाव लागत नाही.

4) पारंपरिक समाजात स्त्रियांचा दर्जा दुय्यम असे.

5) समाज परिवर्तनासाठी लोकशाही आवश्यक आहे.

6) भारतात लोकपाल व लोकायुक्त या अधिकारपदांची निर्मिती करण्यात आली.

7) सागरमालाया योजनेत रस्त्यांचा व्यापक विकास अभिप्रेत आहे.

**प्र.4 खालील विधानांचा सहसंबंध स्पष्ट करा. (कोणतेही तीन).** **(9)**

1) हार्डपॉवर आणि सॉफ्टपॉवर

2) जागतिकीकरण आणि संस्कृती

3) भारतीय समाज आणि स्त्रीपुरुष विषमता.

4) सुशासन आणि ई-प्रशासन

5) भारत आणि पश्चिम आशिया

**प्र.5 खालील विषयावर तुमचे मत 25 ते 30 शब्दात मांडा. (कोणतेही तीन)** **(12)**

1) उदारमतवादी लोकशाही

2) सहभागयुक्त राज्य समाजासाठी हितकारक आहे.

3) सक्षमीकरण ही संकल्पना स्पष्ट करा.

4) दहशतवाद म्हणजे काय?

5) अलिप्ततावादाचे धोरण.

**प्र.6 खालील प्रश्नांची उत्तरे 80 ते 100 शब्दात लिहा. (कोणतेही दोन)** **(10)**

1) सोव्हिएट रशियांच्या विघटनाचे परिणाम लिहा.

2) जागतिकीकरणानंतर व्यापार क्षेत्रात घडून आलेले बदल.

3) हरितक्रांती म्हणजे काय?

4) राष्ट्रीय एकात्मतेचे मानसिक परिणाम स्पष्ट करा.

**प्र.7 खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सुमारे 150 ते 200 शब्दात स्पष्ट करा.** **(10)**

1) सुशासनाची पुढे दिलेली मूल्ये सविस्तरपणे स्पष्ट करा.

अ) सहभागात्मक

ब) पारदर्शकता

क) प्रतिसादात्मक

ड)उत्तरदायित्व.

2) भारताचे शेजारी राष्ट्रांशी असलेले संबंध स्पष्ट करा.

अ) नेपाळ

ब) बांगलादेश

क) श्रीलंका

ड) म्यानमार.

## -----श्रेय नामावली----

| अ.क्र. | सुलभकाचे नाव | पद | उच्च माध्य. विद्यालय/ कनिष्ठ महाविद्यालय. |
|---|---|---|---|
| १) | प्रा.श्री.राहुल दत्तात्रय वराडे | उच्च माध्य.शिक्षक | नंदिनीबाई मुलींचे कनिष्ठ महाविद्यालय, जळगाव. |
| २) | प्रा.श्री.मिलिंद जनार्दन मनवर | उच्च माध्य.शिक्षक | वाघमायदेवी आदिवासी कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय रुई (गोस्ता) ता.मानोरा जि. वाशीम. |
| ३) | डॉ.अतुल सोपानराव इंगळे | उच्च माध्य.शिक्षक | स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालय, जळगाव. |

----------BEST OF LUCK--------